शहर वाहतूक शाखेच्या पथकाची कारवाई

# अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहनपरवाना वाहनांवर ८३ हजार १५० रूपयांचा दंड

**नांदेड (प्रतिनिधी)** - शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या आटोक्यात आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहर वाहतूक शाखेला आदेशित केले होते. त्यानुसार शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना/वाहणे, भरधाव वाहने, फटाका बुलेट व फळांचे गाड्यांचे रस्त्यावरील अतिक्रमण या विरोधात रविवारी (दि. १९) धडक मोहीम राबविण्यात आली. यात कारवाईत फटाका बुलेट, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर केसेस अशा एकुण ८० केसेस करून एकुण ८३ हजार १५० रूपयाचा दंड आकारण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक (इतवारा) राजकुमार हिंगोले यांनी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अमलदारांना सोबत घेऊन जुना मोंढ्यात वाहनांची तपासणी केली. या तपासणीत ऑटो चालकांना गणवेश परिधान करण्याच्या सुचना दिल्या. जुना मोंढा येथील फळांच्या गाड्यांवर कार्यवाही करण्यात आली. तसेच फटाका बुलेट, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर केसेस अशा ८० केसेस करण्यात आल्या. त्यातून ८३ हजार १५० रूपयांचा दंड आकारण्यात आला.

दिवाळीमुळे शहर व बाजारपेठेत गर्दी होत असल्यामुळे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी आपली दुचाकी, चार चाकी वाहने पार्किंगमध्येच ठेवावीत, असे आवाहन इतवारा शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार हिंगोले यांनी शहरातील नागरिकांना केले आहे.

दै. प्रजावाणी दि. 20.10.25

# मांडवीत १ लाख २९ हजारांचा गुटखा जप्त



**वार्ताहर • मांडवी**

मांडवी पोलिसांनी शनिवारी, दि. १८ रोजी मोठी कारवाई करत प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याचा सुमारे १ लाख २९ हजार २९० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

माहूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) किरण बोंडवे यांना गुप्त माहिती मिळाल्यावर त्यांनी मांडवी पोलीस स्टेशनला भेट देत तपासणी मोहीम हाती घेतली. यावेळी पोलिसांचे पथक पोलीस शिपाई परमेश्वर मामीडवार, सपोनि. गंगाधर गायकवाड, पो. कॉ. मनीष ठाकरे, पो. कॉ. अस्वले, पो. कॉ. गुव्हाडे आदि शिवाजी चौकातील किराणा दुकानावर पोहचले. तपासा दरम्यान दुकानधारक आशिष बालाजी कोटावार (वय ४४) यांच्या दुकानामागील गोडाऊनमध्ये २५ पोत्यांमध्ये एकूण १८१४ पॅकेट्स प्रतिबंधित गुटखा व पान मसाला आढळून आला. त्यामध्ये सागर, विमल, ब्लू, राजनिवास आदी विविध कंपनीचे गुटखा व पानमसाला समावेश होता. जप्त केलेल्या मुद्देमाल पंचांच्या उपस्थितीत मांडवी पोलीस स्टेशनं येथे जमा करण्यात आला. याप्रकरणी आशिष कोटावार यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नूतन डीवायएसपी किरण बोंडवे यांच्या नेतृत्वाखालील या कारवाईमुळे मांडवी परिसरातील अवैध धंद्यांना मोठा चाप बसणार आहे.